मोटरसायकल-कंटेनर अपघातात दोन तरुण ठार

लोकसत्ता वार्ताहर

जुन्नर : नगर-कल्याण महामार्गावर डुंबरवाडी गावाच्या हद्दीत शनिवारी (दि. १३) रात्री सव्वाअकराच्या सुमारास मोटरसायकल आणि कंटेनर यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रणव नितीन डुंबरे (वय २५, रा. ओतूर, ता. जुन्नर) आणि गणेश विजय गाडेकर (रा. डिंगोरे, ता. जुन्नर) अशी अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. शनिवारी रात्री सव्वाअकराच्या सुमारास प्रणव आणि गणेश हे दोघे त्यांच्या मोटरसायकलवरून आळेफाटा बाजूकडून ओतूरच्या दिशेने चालले होते. याच वेळी कल्याण बाजूकडून नगरच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरने दुचाकीला जोरदार धडक दिली. हा अपघात एवढा भीषण होता की, दोन्ही तरुणांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातग्रस्त कंटेनरचा चालक गणेश बाबासाहेब शिंदे (वय ३७, रा. हिवेसिंगा, खोकारमोह, ता. जि. बीड) हा असून, ओतूर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. या घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

'या प्रकरणी ओतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून, पुढील कायदेशीर कारवाई केली जात आहे,' असे ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी सांगितले.

स्वायत्त महाविद्यालयांकडून बदलांचे पाऊल अपेक्षित

कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांचे आवाहन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करताना 'सर परशुरामभाऊ महाविद्यालया'सारख्या नामांकित स्वायत्त संस्थांनी आता काळाच्या पाऊलखुणा ओळखून वेगळा विचार करण्याची गरज आहे. आगामी काळातील शैक्षणिक स्थित्यंतरामध्ये विद्यार्थी स्वतःची प्रतिष्ठा स्वतःहून ठरवतील आणि मागणीनुसार परीक्षा देतील. या क्रांतिकारी बदलाचा स्वीकार करून सर्वच स्वायत्त महाविद्यालयांनी शैक्षणिक क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकावे,' अशी अपेक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केली.

'सर परशुराम महाविद्यालयाच्या शतकोत्तर दशकपूर्तीचा सोहळा रविवारी साजरा करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर आदी या वेळी उपस्थित होते. शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष ॲड. सदानंद फडके कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष सुधीर काळकर आणि उपाध्यक्ष गजेंद्र पवार उपस्थित होते. या वेळी पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली उगले आणि पुणे विभागाचे मुख्य आयकर आयुक्त विवेक वाडेकर या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. 'स.प. महाविद्यालयाने कायमच मातृभाषेचा ध्यास घेतला. मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या संस्था कमी होत चालल्या आहेत. ज्यामध्ये देशाच्या प्रगतीची बीजे आहेत, अशा संस्थांना वेगवेगळ्या सवलती जाहीर करा,' असे ॲड. फडके यांनी सांगितले.

'पदवीच्या शिक्षणासाठी पालक कर्ज काढून मुलांना प्रदेशात पाठवत आहेत. चांगल्या दर्जाचे शिक्षण भारतात उपलब्ध असून, हा ओघ थांबवला पाहिजे. त्या पद्धतीने गरजा ओळखून शिक्षण पद्धतीतही बदल करावा लागेल,' असे मत उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोरे यांनी प्रास्ताविक केले.

मंडई परिसरात 'प्राइड मार्च'

'युक्ता एलजीबीटीक्यू'च्या वतीने मंडई परिसरात 'प्राइड मार्च'चे आयोजन करण्यात आले. 'एलजीबीटीक्यू' समुदायाने यात भाग घेतला. विविधता, सर्वसमावेशकता आणि समान हक्कांचा पुरस्कार या वेळी करण्यात आला. (छाया : अरुल होरायझन)

रिक्षाचालकासह दुचाकीस्वार तरुणाला लुटले

पुणे : शहरात लूटमारीच्या वेगवेगळ्या घटनांत रिक्षाचालकासह दुचाकीस्वार तरुणाला लुटण्यात आल्याच्या घटना घडल्या. बिबवेवाडी, तसेच हडपसरमधील फुरसुंगी परिसरात लूटमारीच्या घटना घडल्या.

बिबवेवाडीतील अप्पर इंदिरानगर परिसरात एका रिक्षाचालकाला चोरट्यांनी लुटल्याची घटना १२ जून रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास घडली. या बाबत रिक्षाचालक सिद्धेश्वर नरहरी मुंढे (वय १९, रा. आंबेगाव, कात्रज) याने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रिक्षाचालक मुंढे अप्पर इंदिरानगर परिसरातून निघाला होता. त्या वेळी दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी त्याला अडवले. चोरट्यांनी त्याला मारहाण करून त्याच्याकडील मोबाइल संच आणि रोकड काढून घेतली. हडपसरमधील फुरसुंगी परिसरात दुचाकीस्वार तरुणाला मारहाण करून त्याच्याकडील मोबाइल संच आणि रोकड असा २८ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटण्यात आल्याची घटना घडली.

मंदाकिनी आवाळे यांचे निधन

पुणे : बालाजीनगर येथील रहिवासी मंदाकिनी आबुराव आवाळे (वय ७७) यांचे रविवारी पहाटे राहत्या घरी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुलगे, सुना, नातवंडे आणि विवाहित कन्या असा परिवार आहे. पत्रकार मनोज आवाळे आणि सामाजिक कार्यकर्ते किशोर आवाळे हे त्यांचे पुत्र होत. मंदाकिनी आवाळे यांच्या पार्थिवावर धनकवडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

'विमान प्रवाशांमध्ये १२ वर्षांत दुपटीने वाढ'

पुणे : 'गेल्या बारा वर्षांत पुणे विमानतळावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांमध्ये दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. २०१४ मध्ये सुमारे ४४ लाख ६० हजार प्रवाशांची संख्या वाढून २०२६ मध्ये ती १ कोटी १३ लाख इतकी झाली. पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. 'या कालावधीत मालवाहतूक सेवांमध्येही मोठी वाढ झाली असून, प्रादेशिक उत्पादने, अभियांत्रिकी, कृषी निर्यातीला चालना मिळाली. विमानांची उड्डाणेही ३५ हजारांवरून ६९ हजारांपर्यंत वाढली आहेत,' असेही त्यांनी नमूद केले.

विमानतळ प्राधिकरणाच्या वतीने पुणे विमानतळावर आज, सोमवारी (१५ जून) 'प्रवासी सुविधा दिन' साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर ढोके यांनी माध्यमांशी संवाद साधला. पुणे विमानतळाच्या १२ वर्षांतील बदलांवर त्यांनी भाष्य केले. ढोके म्हणाले, 'गेल्या बारा वर्षांत पुणे विमानतळाने अभूतपूर्व कामगिरी केली. सुलभ विमानसेवेमुळे पुणे आणि पश्चिम महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली. मार्च २०२५ मध्ये नव्या एकात्मिक टर्मिनल इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. त्यामुळे प्रवासी हाताळणी क्षमता वाढली.'

तरुणाकडून लाखोंचा गांजा जप्त

रेंजहिल्स परिसरात कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : गांजा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला खडकी पोलिसांनी रेंजहिल्स परिसरातून अटक केली. त्याच्याकडून गांजा, महागडा मोबाइल संच असा दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी अनिकेत नीरज मलिक (वय २८, रा. सिद्धिविनायक सोसायटी, एनडीए रस्ता, शिवणे) याला अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध अमली पदार्थविरोधी कायद्यान्वये खडकी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. शनिवारी (१३ जून) मध्यरात्री पोलिसांचे पथक रेंजहिल्स परिसरात गस्त घालत होते. तेथील फुटबॉल मैदानाजवळ नीरज मलिक पिशवी घेऊन थांबला होता.

पोलिसांना पाहताच मलिक तेथून गडबडीत निघाला. पोलिसांना संशय आल्याने मलिक याची चौकशी केली. त्याच्याकडील पिशवीची तपासणी केली. तेव्हा पिशवीत गांजा सापडला. मलिक याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली. मलिक मूळचा जळगावचा रहिवासी आहे. त्याने गांजा कुठून आणला, तसेच, तो कोणाला विक्री करणार होता, या दृष्टीने तपास करण्यात येत आहे.

गांजा बाळगणारा अल्पवयीन ताब्यात

गांजा बाळगणाऱ्या एका अल्पवयीनाला नांदेड सिटी पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक किलो ६४ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. ताब्यात घेण्यात आलेला १५ वर्षीय मुलगा मूळचा बीडमधील आनंदनगरचा रहिवासी आहे. या बाबत पोलीस हवालदार संग्राम शिनगारे यांनी नांदेड सिटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. धायरीतील वारंगणी मळा रस्त्यावर ११ जून रोजी सकाळी पावणेअकराच्या सुमारास अल्पवयीन थांबला असून, त्याच्याकडे गांजा असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे असलेल्या पिशवीची तपासणी करण्यात आली. तेव्हा पिशवीत गांजा सापडला. अल्पवयीनाकडून जप्त केलेल्या गांजाची किंमत ३० हजार रुपये आहे. त्याच्याकडून गांजा, पिशवी, तसेच मोबाइल संच जप्त करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक दत्तात्रय सावंत तपास करत आहेत.

समाजोपयोगी कामे करताना अनेक अडथळे

'वनराई'चे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांची खंत

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'समाजोपयोगी कामे करताना अनेक अडथळे निर्माण होतात. नोकरशाहीचा त्रासही जाणवतो, त्यामुळे यंत्रणा विस्कळीत होते,' अशी खंत 'वनराई'चे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी रविवारी येथे केली.

'सरहद नॅशनल स्कूल' आणि 'विजय फाऊंडेशन'च्या नूतन इमारतीचे उद्घाटन माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते रविवारी झाले. त्या वेळी गांधी बोलत होते. सरहद संस्थेचे संस्थापक संजय नहार, विजय फाऊंडेशनचे संतसिंग मोखा, डॉ. शैलेश पगारिया, शैलेश वाडेकर, चरणजिसिंग सहानी या वेळी उपस्थित होते. या वेळी मोखा यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला.

गांधी म्हणाले, 'ज्या ठिकाणी कोणीही काम करण्यास पुढे येत नाही, तेव्हा नहार हे नेहमीच आघाडीवर असतात. काश्मीर, पंजाब, आसाम या द्वेषाने पेटलेल्या राज्यात जाऊन तेथे सौहार्दपूर्ण वातावरण तयार करण्याचे काम त्यांनी केले. काश्मीरच्या मुला-मुलींना पुण्यात आणून त्यांना शिक्षणाचे धडे देऊन त्यातून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविले आहे.'

या वेळी नहार यांनी प्रास्ताविकात शाळेच्या इमारतीची माहिती दिली. मोखा यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कर्नाटक हापूसचा हंगाम अखेरच्या टप्प्यात

पावसाने उघडीप दिल्याने उच्चांकी आवक

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : कर्नाटक हापूस आंब्याचा हंगाम अंतिम टप्प्यात असताना उच्चांकी आवक झाली. कोकणातील हापूसचा हंगाम संपल्यानंतर पुणे, मुंबईसह राज्यातील प्रमुख बाजारात कर्नाटकातील हापूसची मोठ्या प्रमाणावर आवक होत आहे. कर्नाटकातील आंब्याना मागणीही चांगली आहे.

'कोकणातून हापूसचे कलमे नेऊन गेल्या वीस ते पंचवीस वर्षांपासून कर्नाटकातील तुमकुर भागातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आंब्याची लागवड केली. कोकणातील हापूसप्रमाणेच कर्नाटकातील आंब्याची चव आहे. शेतकऱ्यांनी आंब्यांची मोठ्या प्रमाणावर पुणे, मुंबईतील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणास विक्रीस पाठविण्यास सुरुवात केली', अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील कर्नाटक आंबा व्यापारी रोहन उरसळ यांनी दिली.

'कर्नाटक हापूसचा हंगाम अंतिम टप्प्यात आला असून, साधारणपणे २५ जूनपर्यंत कर्नाटक आंब्याचा हंगाम सुरू राहणार आहे. पावसाने उघडीप दिल्याने शनिवारी (१३ जून) कर्नाटकातील आंब्याची दहा ते पंधरा हजार पेटींची आवक झाली. एका पेटीत तीन ते पाच डझन आंबे असतात. कच्च्या आंब्याच्या पेटीचे दर (तीन ते पाच डझन) ८०० ते १२०० रुपये आहेत. किरकोळ बाजारात कर्नाटकातील एक डझन तयार आंब्याचे दर प्रतवारीनुसार ४०० ते ६०० रुपये डझन आहेत', असे त्यांनी सांगितले.

आंब्याचे दर

कर्नाटक हापूस (कच्चा आंबा ३ ते ५ डझन पेटी) - ८०० ते १२०० रुपये, कर्नाटक हापूस एक डझन (तयार) - ४०० ते ६०० रुपये, कर्नाटक पायरी (कच्चा आंबा ३ ते ५ डझन पेटी) - ८०० ते १२०० रुपये, लालबाग (एक किलो) - ३० ते ३५ रुपये, बदाम (एक किलो) - ३० ते ३५ रुपये

गावरान हापूसचा हंगाम बहरला : 'गावरान हापूसचा हंगाम बहरला आहे. गावरान हापूसची आवक वाढली आहे. केशर आंब्याची आवक मोठ्या प्रमाणावर होत आहे', अशी माहिती आंबा व्यापारी युवराज काची यांनी दिली.

यंदा पावसाने उघडीप दिल्याने कर्नाटकातील आंब्याची अखेरच्या टप्प्यात उच्चांकी आवक झाली आहे. गेल्या वर्षी पाऊस लवकर सुरू झाल्याने जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात एक ते दोन हजार पेटी एवढी आवक झाली. पुणे, मुंबईतील बाजारपेठेत चांगले दर मिळत असल्याने कर्नाटकातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आंबा विक्रीस पाठविला. पुण्यातील फळबाजारात दहा ते पंधरा हजार पेटी आवक झाली. कर्नाटक हापूसचा हंगाम २५ जूनपर्यंत सुरू राहील. – **रोहन उरसळ,** कर्नाटक आंबा व्यापारी, छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड

दैनंदिनी

● **धार्मिक :** श्री विठ्ठल मंदिर नवी पेठ, मराठा मंडळ ट्रस्ट, अधिक मासानिमित्त हरिनाम महोत्सव, काकड आरती (पहाटे ५), गाथा पारायण (सकाळी ७), भजन (सकाळी १०), कीर्तन (सायं. ७), स्थळ – श्री विठ्ठल मंदिर, नवी पेठ

● **धार्मिक :** श्री निवडुंगा विठोबा देवस्थान संस्थान, अधिक मासानिमित्त श्री हरिनाम महोत्सव, काकड आरती, महापूजा (पहाटे ५.३०), श्री एकनाथी भागवत पारायण (सकाळी ७.३०), काल्याचे कीर्तन, कीर्तनकार – अशोक महाराज मोरे, (सकाळी ९ ते ११), श्री हरिपाठ (दुपारी ४), अधिक माहात्म्य (सायं. ५.१५), श्री हरिकीर्तन (सायं. ६), स्थळ – श्री निवडुंगा विठोबा मंदिर, नाना पेठ

● **प्रकाशन :** वनराई, प्रमोद जाधवलिखित 'आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती' या पुस्तकाचे प्रकाशन, भाताच्या विविध देशी वाणांचे प्रदर्शन, हस्ते – दत्तात्रय भरणे, अध्यक्ष – गिरीश गांधी, प्रमुख उपस्थिती – रवींद्र धारिया, दीपा मुधोळ–मुंडे, विनयकुमार आवटे, संजय पाटील, वैद्य विनायक खडीवाले, स्थळ – वनराई मुख्यालयातील इको हॉल, मित्रमंडळ चौक, सकाळी १०.३०

● **जनजागृती कार्यक्रम :** जनसेवा फाऊंडेशन, ज्येष्ठ नागरिक छळविरोधी जनजागृती दिन, प्रा. मेधा कुलकर्णी यांचा सत्कार, प्रमुख उपस्थिती – मंजूषा नागपुरे, मुरलीधर मोहोळ, अमितेशकुमार, दीपा मुधोळ, विशाल लोंढे, अध्यक्ष – प्रा. तेज निवळीकर, स्थळ – निवारा संस्थेचे सभागृह, गांजवे चौक, नवी पेठ, दुपारी ४

● **धार्मिक :** ग्रंथ पारायण, दिंडी, गीताधर्म मंडळ, गोकथा, प्रवचनकार – परेशबुवा देवळणकर, स्थळ – गीताधर्म मंडळ, सदाशिव पेठ, सायं. ५.३०

● **सन्मान सोहळा :** महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभा, मनीषा प्रकाशन, डॉ. शिवाजीराव कदम यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त सन्मान सोहळा, मानपत्र प्रदान, हस्ते – डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रमुख उपस्थिती – चंद्रकांत दळवी, सतीश मगर, विश्वास पाटील, विश्वजित कदम, अध्यक्ष – विद्याधर अनास्कर, मधुकर भावे संपादित 'ज्ञानतपस्वी' पुस्तकाचे प्रकाशन, स्थळ – एस. एम. जोशी सभागृह, गांजवे चौक, नवी पेठ, सायं. ५.३०

● **सांगीतिक :** पूना गेस्ट हाऊस स्नेहमंच, हेमंत कुमार यांना सांगीतिक मानवंदना, 'ये नयन डरे...डरे', मैफल, सहभागी गायक – हेमंत खणंग, दीपाली राजे, मनाली राजे, रेवती सुपेकर, सरिता फडके, स्थळ – पूना गेस्ट हाऊस, बेलबाग चौकाजवळ, लक्ष्मी रस्ता, सायं. ५.३०

● **धार्मिक :** श्री महालक्ष्मी मंदिर, अधिक मासानिमित्त कार्यक्रम, होम पूर्णाहुती हवन, ब्राह्मण भोजन, स्थळ – श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग, सायं. ५

EXPRESS Careers

श्री. संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर संचलित
(कन्नड भाषिक अल्पसंख्याक संस्था)
संगमेश्वर कॉलेज, सोलापूर

पाहिजेत

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर या संस्थेच्या संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सन २०२६-२०२७ पासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे पूर्णवेळ शिक्षकांची (शिक्षणसेवक) पदे भरावयाची आहेत. तरी पात्र उमेदवारांनी विहित कालमर्यादेत अर्ज करावेत.

अ. अनुदानित विभाग

अ. क्र.	विषय	शैक्षणिक पात्रता	पदे
१	इंग्रजी	एम. ए. द्वितीय श्रेणी, बी. एड.	१ पूर्णवेळ
२	भौतिकशास्त्र	एम.एस्सी. द्वितीय श्रेणी, बी. एड.	२ पूर्णवेळ
३	रसायनशास्त्र	एम.एस्सी. द्वितीय श्रेणी, बी. एड.	१ पूर्णवेळ
४	कन्नड	एम. ए. द्वितीय श्रेणी, बी. एड.	१ तासिका

सविस्तर जाहिरात पाहण्यासाठी www.sangameshwarcollege.in या संकेतस्थळास भेट द्यावी.
दिनांक : १५.०६.२०२६

प्र. प्राचार्य, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर
सचिव, श्री. संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर

M.C.E. Society's
ABEDA INAMDAR SENIOR COLLEGE of Arts, Science & Commerce (Autonomous)
Religious & Linguistic Minority Education Institution
2390-B, K.B. Hidayatulla Road, Azam Campus, Camp, Pune-411001
Id No. : {PU/PN/ASC/088/(1992)}
Mobile : 9422013735 E-mail : prin-aisc@azamcampus.org
Accredited with 'A' Grade by NAAC, Bangalore

APPOINTMENT

Applications are invited from eligible candidates for the post of Assistant Professor to be filled on full time basis in the permanent non grant section in following subjects at Under Graduate & Post Graduate Level on the availability of workload in the respective subjects.

Faculty	Under Graduate Subject	No.of Posts Reqd.	Post Graduate Subject	No.of Posts Reqd.
Arts	English	01 F.T.	English	02 F.T.
	Economics	01 F.T.	Economics	01 F.T.
	Political Science	01 F.T	Urdu	01 F.T.
	Chemistry	01 F.T.	Chemistry	05 F.T.
	Mathematics	01 F.T.	Mathematics	01 F.T.
	Computer Science and Computer Application	04 F.T.	-----	----
Commerce	B.Com. (BM)-(BBA)	01 F.T.	-----	-----
	B.Com.(CA)- (BBA-CA)	02 F.T.	-----	-----

Required Qualifications :-
1) Qualification, service terms and conditions as per the norms of UGC/ Govt. of Maharashtra/Savitribai Phule Pune University and as applicable to the Minority Educational Institutions.
2) The Candidate should be able to teach through English Medium. Computer knowledge is essential.
3) No TA/DA will be paid to the candidates.
4) Applications along with relevant documents should reach on the above address within 10 days in hard copy only .

Date: 15/06/2026 Dr. Shaila Bootwala, Principal Mrs. Abeda Inamdar, President

M.C.E. Society's
ABEDA INAMDAR SENIOR COLLEGE of Arts, Science & Commerce (Autonomous)
Religious & Linguistic Minority Education Institution
2390-B, K.B. Hidayatulla Road, Azam Campus, Camp, Pune - 411001
Id No. : {PU/PN/ASC/088/(1992)}
Mobile : 9422013735 E-mail : prin-aisc@azamcampus.org
Accredited with 'A' Grade by NAAC, Bangalore

WALK IN INTERVIEW

Eligible candidates are invited to attend a **"Walk in Interview"** for the post of **Assistant Professor** to be held on **Tuesday, 23rd June 2026 at 10.30 a.m.** onwards in the College office. The vacancies will be filled on **Clock Hour Basis** in grant–in–aid section on Temporary basis for the academic year 2026-27 in the following subjects and number of posts required as per the availability of workload in the respective subject at Under Graduate level.

- **Arts : Urdu (1), Arabic (1), Marathi (1) and Sociology(2)**
- **Science : Chemistry (1), Microbiology (5), Botany (1), Mathematics (2)**
- **Commerce : All subjects (4)**

Qualifications:-(1)Qualification, service terms & conditions as per the norms of UGC Regulation 2018/Savitribai Phule Pune University / Government of Maharashtra Resolution क्र. संकीर्ण - 2018/(185/18) / मशि -3, दि. 14/11/2018 क्र. संकीर्ण - 2021 / प्र.क्र /(181 / 21) विशि- dated 17/10/2022 and 27/03/2023 and as applicable to Minority Educational Institutions.
(2) Candidate should be able to teach through English Medium. Computer knowledge is essential
(3) No TA/DA will be paid to the candidates.

Date: 15/06/2026 Dr. Shaila Bootwala, Principal Mrs. Abeda Inamdar, President

DES' Shri Navalmal Firodia Law College, Pune.
Gate No. 3, Fergusson College Campus, Pune - 411004.
Tel: (020) 67656400/06 | E-mail: deslaw@despune.org

WALK -IN INTERVIEWS

(Un- Aided and Approved by Bar Council of India and permanently affiliated to Savitribai Phule Pune University, Pune.)

Applications are invited for the Walk In Interview for an appointment of Assistant Professor in various disciplines mentioned below for the academic year 2026-27 on Ad-hoc basis. The interviews will be conducted on 20.06.2026 at 11.00 am at DES's Shri. Navalmal Firodia Law College Pune. The details of the post and subjects are as follows.

Sr. No.	Post	Subject	No. of Posts	Category	
1.	Assistant Professor	English (For B.A. LL.B., B.B.A.LL.B. 5 Years Law Integrated Course)	1 (Ad-hoc)	Open to all	MA (English) & NET/SET/ Ph D. as per UGC Norms
2.	Assistant Professor	Business Management (For B.B.A.LL.B. 5 Years Law Integrated Course)	1 (Ad-hoc)	Open to all	MBA (as per UGC Norms)
3.	Assistant Professor	Law (UG) (For B.A.LLB, B.B.A.LL.B. and LL.B. Courses)	12 (Ad-hoc)	SC-02, ST-01, VJ-A-01, NT-B-01, OBC-2, SEBC-01, EWS-01, Open-03	LLM & NET/ SET/Ph D. as per UGC Norms
4.	Assistant Professor	Law (PG) (For LL.M. P.G. Course)	2 (Ad-hoc)	SC-01, Open-01	LLM & NET/ SET/Ph D. as per UGC Norms

Note:- PWd/ दिव्यांग (गट–अ)candidate will be given preference

Secretary
Deccan Education Society, Pune

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट – IV-A – अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय :- 9वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली - 110001, फोन्स :- 011-23357171, 23357172, 23705414, वेब. :- www.pnbhousing.com

शाखा पिंपरी चिंचवड : कार्यालय क्र. 302, तिसरा मजला, घीवाला कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, चिंचवड, पुणे, महाराष्ट्र - 411019, **शाखा कोल्हापूर:** 401/402, चौथा मजला, मातोश्री प्लाझा, व्हीनस कॉर्नर, शाहूपुरी, कोल्हापूर, महाराष्ट्र - 416001, **शाखा पुणे :** युनिट क्र. 601, 602, 603, 604, 605, 606, सहावा मजला, प्राइड हॉटेल कॉन्क्लेव्हच्या मागे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र-411005.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **रचनात्मक / प्रत्यक्ष** ताबा घेतलेला असून (स्तंभ - सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.
याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम - 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला **www.pnbhousing.com** येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार / सह कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे / न्यायालयीन कज्जे (के)
HOU/PM/0215/212581, राजेंद्र बाळकृष्ण बोरुडे / सविता आर बोरुडे, शाखा : पिंपरी चिंचवड	रु. 22,08,929.4 आणि 14-02-2024	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट क्र. 202, दुसरा मजला, स. क्र. 106, घर क्र. 1ए, विंग ए, संस्कार रेसिडेन्सी, आळंदी रोड, चोवीस वाडी, चरहोली, पुणे, महाराष्ट्र-412105, भारत.	रु. 15,03,000	रु. 1,50,300	29/06/2026	रु. 10,000	25-06-2026 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00	30-06-2026 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00	ज्ञात नाही
HOU/KOP/0618/550111, विजय गणपती महेकर / सुप्रिया विजय महेकर / अजय कृष्णात कुंभार, शाखा : कोल्हापूर	रु. 54,02,900.17 आणि 16-02-2023	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट क्र. 203, दुसरा मजला, दौलत अपार्टमेंट, प्लॉट क्र. 36, आर एस क्र. 524, 2 गैबीपीर नगर, सांगाव रोड, होलीडेन इंग्लिश मीडियम स्कूल जवळ, कागल, कोल्हापूर, महाराष्ट्र-416216, भारत.	रु. 22,35,000	रु. 2,23,500	29/06/2026	रु. 10,000	20-06-2026 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00	30-06-2026 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00	ज्ञात नाही
HOU/PUN/0422/980632, देवेंद्र रामप्रताप सिंग / कुसुम रामप्रताप सिंग, शाखा : पुणे	रु. 50,37,688.42 आणि 08-09-2023	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट क्र. 203, दुसरा मजला, रॉयल रेसिडेन्सी, स. क्र. 457, आशियाना फेज 3, प्लॉट क्र. 77, कासार आंबोली, पुणे, महाराष्ट्र-412108, भारत.	रु. 15,84,000	रु. 1,58,400	29/06/2026	रु. 10,000	22-06-2026 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00	30-06-2026 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00	ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. (1) आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्र.- के मध्ये केला आहे. (2) संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात **पीएनबीएचएफएल** यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. (3) कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून **15 दिवसांचे आत** जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. (4) **सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - www.bankeauctions.com,** मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, **पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती - गणेश अंकुश / निलाक्षी पाटील, टोल फ्री क्र. : 1800 120 8800, ई-मेल : auction@pnbhousing.com, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

ठिकाण :- पुणे, दिनांक :- 15.06.2026
स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड